# चा-याचा मुरघास करुन साठवणे





## हिरवा चारा:

मका, बार्ली, ज्वारी/बाजरी, उसाचे वाडे इ. चाऱ्याची कापणी करून १ दिवस उन्हात वळवावा. चारा काढणीस उशीर झाला असेल तर वळवल्याची गरज नाही.



कुट्टी करून हवाबंद पिशवी मध्ये जितके शक्य आहे तितके दाबून भरावा.

हवाबंद पिशवी मध्ये आंबवण्याच्या प्रक्रीये मध्ये हिरव्या चा-यातील शर्करेचे रुपांतर आम्ला मध्ये होऊन चाऱ्यातील जीवनसत्वाची संवर्धन होते तसेच पोष्टिकता वाढते.

- पिशवी कोठेही दुमडू नये (हवा राहू नये) ह्याची काळजी घ्यावी. त्यासाठी पिशवीची चारही टोके दोरीच्या साह्याने छताच्या आधाराला ताणून बांधून घ्यावी.
- पिशवीचे तोंड बंद करून पिशवीवर वजन ठेवावे.
- तोंड बंद करतांना, पिशवी चे तोंड नीट पणे घडी करुन ठेवावे ज्या योगे हवा आत जाणार नाही.

## विशेष काळजी:

- चाऱ्याचा हवेशी संपर्क आल्यास चाऱ्याला बुर्शीची लागण होऊन चारा खराब होतो.
- वापरण्यास सुरवात केल्यावर मुरघासची रोज बांधून ठेवावी तसेच मुर्घर ७ ते १० दिवसात संपवावा.

Vigyan Ashram
At. Post. Pabal, Dist. Pune - 412403
Whatsapp No. 9730005016 / 9579734720 • www.vigyanashram.com